# विना नंबर टिप्पर आणि अवैध गौणखनिज वाहतुकीवर कडक कारवाई!

## ५ महिन्यांत ३३९ विना नंबर टिप्परवर कारवाई, ३५ लाखांचा दंड वसूल

**बुलडाणा (जिमाका) –** उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बुलढाणा अंतर्गत कार्यरत वायुवेग पथकाने जानेवारी ते मे २०२५ या पाच महिन्यांच्या कालावधीत बेकायदेशीर खनिज वाहतूक करणाऱ्या आणि विना नंबर प्लेट टिप्पर वाहनांवर धडक कारवाई केली आहे.

या कालावधीत एकूण ८३५ वाहनांची तपासणी करण्यात आली असून, त्यातील ३३९ विना नंबर टिप्पर वाहनांवर कारवाई करत ३५ लाखावरुन जास्त दंड वसूल करण्यात आल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ज्ञानेश्वर हिरडे यांनी दिली.

महिन्यानुसार तपासणी व कारवाईचा तपशील : जानेवारी महिण्यात ११६ वाहनांची तपासणी करुन ४० वाहनावर कारवाईत ४ लक्ष ९ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

फेब्रुवारीमध्ये १८९ वाहनांची तपासणी करुन ६३ वाहनावर कारवाई करत ८ लक्ष ७१ हजार रुपये दंड, मार्चमध्ये १२७ वाहनांची तपासणी करुन ३६ वाहनावर कारवाई करत ५ लक्ष ८७ हजार रुपये दंड, एप्रिलमध्ये ९८ वाहनांची तपासणी करुन २५ वाहनावर कारवाई करत ५ लक्ष ६८ हजार ५०० रुपये दंड, मेमध्ये ३०५ वाहनांची तपासणी करुन १७५ वाहनावर कारवाई करत १० लक्ष ९६ हजार ३५० रुपये दंड, असे एकूण पाच महिण्यात ८३५ वाहनांची तपासणी करुन ३३९ विना नंबर टिप्पर वाहनांवर ३५ लक्ष ३१ हजार ८५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. विना परवाना, विना नंबर प्लेट किंवा बेकायदेशीर गौण खनिज वाहतूक करू नये. असे प्रकार आढळल्यास मोटार वाहन कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येईल, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ज्ञानेश्वर हिरडे यांनी वाहनधारकांना केले आहे. परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे की भविष्यात देखील अशा बेकायदेशीर कृत्यांवर लक्ष ठेवून कठोर पावले उचलण्यात येणार आहेत. वाहनधारकांनी नियम पाळून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# मनसेचे चिखलीत घंटानाद आंदोलन



**चिखली (महासागर प्रतिनिधी) –** महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०२४– २५ मध्ये पंचायत समिती चिखली अंतर्गत एकूण ६०६ विहिरींना मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर सिंचन विहीर योजनेमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून एका विहिरीसाठी प्रत्येकी ७० हजार रुपयांची रक्कम काही रोजगार सेवक, ग्राम पंचायत सचिव त्याचप्रमाणे खाजगी दलालांमार्फत अधिकाऱ्यांनी घेतल्याची सर्वत्र चर्चेला आहे.

ग्राम पंचायत कार्यालयामार्फत घेतलेल्या ग्राम सभेमध्ये विहीर मंजुरी करिता जो प्राधान्यक्रम दिलेला आहे. त्या प्राधान्य क्रमानुसार विहिरीचे वाटप झालेले नसून कोणताही प्राधान्यक्रम अधिकाऱ्यांनी घेतलेला नाही. अनुसूचित जाती अनुसूचित जमाती विधवा महिला विकलांग कुटुंबातील कर्ता व्यक्ती महिला दारिद्र्यरेषेखालील कुटुंब या गोरगरीब नागरिकांना वगळता केवळ पैसे पुढे करणाऱ्या दांडग्यांच्या विहिरी मंजूर करण्यात आलेल्या आहे.

त्यामुळे सिंचन विहीर घोटाळ्यात झालेल्या भ्रष्टाचाराला वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने दिनांक १९ मे २०२५ रोजी जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांना निवेदन देऊन सदर योजनेत स्वतः लक्ष देऊन झालेल्या प्रकाराची चौकशी समितीद्वारे चौकशी करण्यात येऊन बोगस लाभार्थ्यांना वाटप झालेल्या विहिरीत तात्काळ रद्द करून गरजू लाभार्थ्यांना सिंचन विहिरी योजनेचा लाभ मिळवून देण्याची मागणी केली होती.

परंतु अद्यापही कोणत्याही प्रकारची चौकशी न झाल्याने मनसेकडून ९ जुन २०२५ रोजी पंचायत समिती चिखली येथे झोपलेल्या प्रशासनाला जागी करण्यासाठी सकाळी ११ वाजेपासून मनसेचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष गणेश बरबडे यांच्या नेतृत्वाखाली जोरदार घंटानाद आंदोलन करण्यात आले.

त्यावेळी जिल्हाध्यक्ष गणेश बरबडे यांच्यासह उपजिल्हाध्यक्ष राजेश परिहार, मनसे विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष शैलेंद्र कापसे, मनसे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रदीप भवर, चिखली तालुकाध्यक्ष विनोद खरापास, चिखली शहर अध्यक्ष नारायण बापू देशमुख, तालुका सचिव प्रवीण देशमुख, शेतकरी सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष अरुण येवले, उप तालुका अध्यक्ष संदीप नरवाडे, उप तालुकाध्यक्ष अविनाश सुरडकर, चिखली शहर उपाध्यक्ष रवी वानखेडे, तालुका सचिव अजय खरपास, मनसे विद्यार्थी सेनेचे उप तालुकाध्यक्ष अंकित इंगळे, विद्यार्थी सेना चिखली शहर अध्यक्ष अंकित कापसे, दिनकर खरपास, पंढरी मैंद, मंगेश उगले, स्वप्निल थीगळे, सागर इंगळे मधुकर ठेंग, विठ्ठल इंगळे, अंकुश भरंडवाल, विजय शिरसाट, शुभम जाधव, शेषराव जाधव, सिद्धू अक्कर, दीपक बरबडे यांसह अन्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्री व्यंकटेश महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिन साजरा



**देऊळगाव राजा (महासागर प्रतिनिधी) –** श्री व्यंकटेश महाविद्यालयामध्ये क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ६ जून रोजी शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी श्री बालाजी संस्थानचे वंशपारंपरिक विश्वस्त व श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे अध्यक्ष राजे विजयसिंह जाधव यांच्या हस्ते शिवशक राजदंड स्वराज्य गुढीचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर गोरे, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

शिवशक राजदंड स्वराज्य गुढी पूजनानंतर छत्रपती शिवरायांना अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख डॉ. आर. एच. देवरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला आणि शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व विशद केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील शहाजीराजे, राजमाता जिजाऊ यांचे योगदान डॉ. देवरे यांनी उदाहरणासह पटवून दिले. छत्रपती शिवरायांचा इतिहास किती जाज्वल्य आणि महत्त्वाचा आहे, हे सुद्धा त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले.

सूत्रसंचालन शारीरिक शिक्षण संचालक डॉ. किरण मोगरकर आणि रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. महेंद्र साळवे यांनी केले. उपस्थितांचे आभार मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव यांनी मानले.

# हेअर सलूनमध्ये कैचीने वार करून घेतला चावा



**खामगाव (का.प्र.) –** जुन्या वादावरून दोन जणांनी हेअर सलून दुकानातच वाद केला. त्यात एक जण दाढी करीत असताना दुसऱ्याने कॉलर पकडली असता दाढी करणाऱ्या व्यक्तीने टेबलावरील कैची घेवून पोटात मारण्याचा प्रयत्न केला आणि चावा घेवून जखमी केले.

चिखली तालुक्यातील अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या इसरुळ येथील रहिवाशी असलेले शेख रशीद शेख अब्दुल वय ३५ वर्ष यांनी तक्रारीमध्ये नमूद केले आहे की, त्यांचा भाऊ मुका आणि बहिरा असून त्यांच्या राहत्या जागेबाबतीत ग्रा. पं. कडे अर्ज केला होता. त्यामुळे गावातीलच त्याचे नातलग असलेले शेख हुसेन शेख दादू यांनी त्यांच्यात हस्तक्षेप करून वाद घातला. ३ जून रोजी शेख हुसेन शेख दादू हे गावातील हेअर सलून दुकानात दाढी करत होते. त्यावेळी शेख रशीद शेख अब्दुल हा तेथे गेला आणि म्हणाला की आमच्या घरगुती प्रकरणात तुम्ही भाग घेवू नये, असे म्हणत त्यांनी त्यांची कॉलर पकडली असता आरोपीने शिवीगाळ करून उजव्या हाताला दाताने चावा घेतला आणि रागाच्या भरात टेबलावरील लोखंडी कैची घेवून वार करीत जीवाने मारून टाकायची धमकी दिली. यामध्ये मोठा अनर्थ होईल या भीतीपोटी हेअर सलून दुकान मालकाने त्यांचा वाद सोडविण्याचा प्रयत्न केला असता त्यांना सोडविताना दुकानातील खुर्ची तुटली आणि त्यांच्या दोन्ही हाताला कैची लागल्याने रक्त निघाले. अशा घटनेवरून ठाणेदार रुपेश शक्करगे यांच्या मार्गदर्शनाखाली डायरी अंमलदार वाघ यांनी फिर्यादी शेख रशीद शेख अब्दुल यांच्या तक्रारी वरून आरोपी शेख हुसेन

शेख दादू यांच्या विरुद्ध कलम ११८(१), ३५२(२), बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल केला असून तपास बिट जमदार देढे यांच्याकडे देण्यात आला आहे.

# थोडक्यात

## लोणार अभयारण्याचा स्थापना दिवस साजरा

**लोणार –** ८ जून २००० या दिवशी स्थापन झालेल्या लोणार अभयारण्याने आपली २५ वर्षे पूर्ण केली. वन्यजीव विभाग लोणार अभयारण्याचे रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. त्यास मी लोणारकर टीम लोणारवासी व विद्यार्थी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यानिमित्ताने पर्यावरण पूरक सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या सायकल रॅलीस ७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. रॅलीला वन्यजीव विभागाचे एसीएफ चेतन राठोड, आरएफओ जाधव वनपाल सदाशिव वाघ, तहसीलदार भूषण पाटील तसेच ठाणेदार निमिश मेहत्रे यांनी हिरवी झेंडी दाखवली. याप्रसंगी सदस्य व मोठ्या प्रमाणात नागरिक हजर होते. ही रॅली लोणार वनकुटी वरून प्राचीन स्मारके व वारसा स्थळे असलेले धार, अन्नछत्र, लिंबी बारव दैत्यसुदन मंदिर, पर्यटक सुविधा केंद्र, या ठिकाणाहून होत गावांमधून परत वनकुटीवर स्वच्छता मोहीम हाती घेऊन छोट्याशा कार्यक्रमाने संपन्न झाली. याप्रसंगी चेतन राठोड, वाघ, सचिन कापुरे, संतोष जाधव, कैलास शिवणकर, प्राध्यापक भिसे यांची समयोजित भाषणे झाली. वनकुटीवर सहभागी विद्यार्थ्यांना रौप्य महोत्सवी वर्षाचे टी-शर्ट देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## ६५ हजाराच्या ॲल्युमिनियम तारांची चोरी, गुन्हा दाखल

**शेगाव–** झाडेगाव रस्ता शेगाव शेतशिवार भाग क्रमांक चार घाटोळ नावाचे रोहित्र डीपी वरून ६५ हजाराच्या ॲल्युमिनियम तारांची अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना ५ जून रोजी उघडकीस आली. याबाबत राकेश दशरथ चौधरी वय ४५ वर्षे सहाय्यक अभियंता शाखा संत गजानन महाराज वितरण केंद्र शेगाव यांनी शहर पोलिसात तक्रार दिली की, झाडेगाव रस्ता शिवार भाग क्रमांक चार घटना नावाचे रोहित क्रमांक ४५२८४९८ वरील दिगंबर नावकर ते मुरलीधर नावकर यांच्या शेतापर्यंत गेलेल्या लघुदाब वाहिनीचे १३ गाड्याचे अंदाजे ३१२० मीटर लांबीचे विद्युत अल्युमिनियम तार ५० हजार रुपयांचे पोलवरून कट करून तसेच डीके लोखंडे ते ठाकूर यांचे शेतापर्यंत शेतीपंप करता पाळोदी रोहित्र क्रमांक ४५२८०२८ वरील लघुदाब वाहिनीच्या ॲल्युमिनियम तार ५ गाळ्याचे अंदाजे बाराशे मीटर लांबीची किंमत पंधरा हजार रुपये असे एकूण ६५ हजार रुपयांचे ॲल्युमिनियम तार कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून कलम १३६ भारतीय विदयुत अधिनियम सुधारणा २००३ भारतीय न्याय संहिते नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अज्ञात चोरट्याने मोटारसायकल पळवली

**बुलडाणा –** जिल्ह्यात चोरट्यांकडून मोटरसायकल चोरी प्रमाणात वाढ झाली असून शहरातील सुंदरखेड परिसरातील व्यक्तीची मोटरसायकल अज्ञात भामट्याने पळवल्याची घटना सोमवार २ जून रोजी घडली असून अज्ञात भामट्याविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. फिर्यादी प्रतापसिंग ठाणसिंग पवार रा.गाडगे नगर सुंदरखेड बुलढाणा यांनी बुलढाणा शहर पोलीस स्टेशन येथे केलेल्या तक्रारीनुसार ते येळगाव जलशुद्धीकरण केंद्रावर नोकरी करत असून सोमवार २ जून रोजी दुपारी १२ वाजेच्या दरम्यान कार्यालय नगर परिषद बुलढाणा येथे १६ नंबर फॉर्म घेण्याकरता आले तेव्हा त्यांची मोटरसायकल एमएच-२८ एआर-४८२८ रंग काळा व निळ्या रंगाची गाडी कार्यालय बाहेरच उभे केली असता कार्यालयातील काम करून बाहेर आलो तर त्यांची मोटर सायकल क्रमांक एम एच २८ एआर ४८२८ ही गाडी ठेवलेल्या जागेवर दिसून आली नाही. नंतर इतर ठिकाणी सगळीकडे शोध घेतला परंतु गाडी काही मिळून आली नाही. त्यांची गाडी कुणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरून नेली असून कारवाई करता त्यांनी तक्रार केली आहे. पुढील तपास मापोनिसा यांचे मार्गदर्शनाखाली पुढील तपास अधिकारी पोहेकॉं. गजानन जाधव हे करीत आहे.

# काँग्रेस शेगाव शहराध्यक्ष देशमुख तर तालुकाध्यक्ष शेजोळे



**शेगाव (महासागर प्रतिनिधी) –** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या शहराध्यक्षपदी शेगाव येथील एकनिष्ठ कार्यकर्ते कैलासबापू देशमुख तर तालुकाध्यक्ष पदावर ज्ञानेश्वरभाऊ शेजोळे यांची निवड करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून काँग्रेसमध्ये सक्रिय काम करत असताना कैलासबापू देशमुख यांनी विविध पदावर आपला कामाचा ठसा उमटवून पक्षात आगळीवेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे पक्षाने देखील त्यांच्या कामाची पावती म्हणून शहराध्यक्ष पदाची माळ त्यांच्या गळ्यात टाकली आहे. हॉटेल असोसिएशन व रोटरी क्लबचे अध्यक्ष पद देखील देशमुख यांच्याकडे असून कार्यकर्त्यांची मोठी फळी त्यांनी निर्माण केलेली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांची ही नियुक्ती प्रांताध्यक्ष हर्षवर्धनदादा सपकाळ यांच्या आदेशाने करण्यात आली आहे. तसेच ग्रामीण भागात युवक काँग्रेस पासून काम करीत गोरगरीब, सर्वसामान्य जनतेच्या सुखदुःखात धावून जाणारा सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून

ओळख असलेल्या गौलखेड येथील ज्ञानेश्वर शेजोळे यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्ष पदावर निवड करण्यात आली आहे. दोन्ही पदाधिकाऱ्यांची निवड मुंबई येथे काँग्रेसच्या प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्षांच्या हस्ते झाली.

ग्रामीण भागात ज्ञानेश्वर शेजोळे यांची मजबूत पकड असून आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुकांमध्ये त्यांचा फायदा काँग्रेसला होणार आहे. एकंदरीत शहराध्यक्ष व तालुकाध्यक्ष निवड करताना काँग्रेसने निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी देत त्यांना न्याय दिला आहे. त्यामुळे निश्चितच काँग्रेसला पुन्हा एकदा नवचैतन्य प्राप्त होण्याची संकेत मिळत आहेत. तर शहर व ग्रामीण भागात काँग्रेसचे मजबूत संघटन उभाऊश्न पुन्हा एकदा जोमाने काँग्रेसला नवचैतन्य प्राप्त करून देण्यासाठी काम करणार असल्याची प्रतिक्रिया नवनिर्वाचित शहराध्यक्ष कैलासबापू देशमुख व तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर शेजोळे यांनी दिली आहे.

# ट्रॅव्हल्सची ट्रकला धडक; एकाचा मृत्यू, तिघे जखमी

**खामगाव (का.प्र.)** – शेलोडी शिवारातील उड्डाणपुलावर आज ९ जुन २५ रोजी मध्यरात्री २.४५ वाजताच्या सुमारास हंस ट्रॅव्हल्स लक्झरी क्र. एआर-११-ई-१५०० चा चालक अशोक शशीराव केसकर याने आपल्या ताब्यातील लक्झरी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोरच्या ट्रक क्र. एपी-२७-टीझेड- २४६६ ला उजव्या बाजुने धडक दिली. धडकेत लक्झरीच्या कॅबीन मधील प्रवाशी राधेश्याम रामलाल परमार (वय ५०, रा. मालगावडी जि. उज्जैन ) यांचा जागीच मृत्यू झाला. तर दिपक शंकरलालजी चव्हाण (रा. वडनगर जि. उज्जैन), बुखारसिंग कच्छाव (वय ६०, रा. देवास), राजा पदम पवार (वय २५, रा. सनावद जि. खंडवा) हे तिघे जखमी झाले. जखमींना त्वरीत सामान्य रूग्णालयात उपचारार्थ भरती केले. याप्रकरणी श्यामलाल रघुनाथ परमार यांनी ग्रामीण पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून उपरोक्त लक्झरी चालकाविरूध्द कलम १०६, १०६ (१), २८१, १२५ (अ), ३२४ (४) भान्यासं नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प मेहुना राजाला लागू

## पोखरा बाबत जनजागृती व मागणी कृती आराखडा बैठक

**देऊळगाव राजा (महासागर प्रतिनिधी) –** तालुक्यातील मेहुना राजा तलाठी मंडळात पोखरा नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प लागू झाला आहे व त्यातील अनेक योजना बाबत सहाय्यक कृषी अधिकारी कुसुम मेहेत्रे, सरपंच मंदाताई बोंद्रे, ग्रामविकास अधिकारी मदन वायाळ , ग्रामपंचायतसदस्य तंटामुक्ती अध्यक्ष संजय राजे, पोलीस पाटील नारायण दहातोंडे, शितल राजे, कविता शिवाजी चाटे, तसेच शेकडो गावकऱ्यां सह मशाल फेरी दिंडी व ग्रामसभा घेऊन मागणी आराखडा बैठक घेण्यात आली सर्वप्रथम वैयक्तिक लाभाच्या योजना व महिला बचत गट बचत गटाच्या माध्यमातून योजना बाबत सहाय्यक कृषी अधिकारी कुसुम मेहेत्रे मॅडम यांनी माहिती दिली आधुनिक पद्धतीचा वापर करून उत्पन्न वाढवणे जमिनीचा पोत सुधारणे मातीचे आरोग्य सुधारणे म्हणजेच आपले आरोग्य सुधारेल विषमुक्त शेती करणे जैविक शेती करणे झिरो बजेट शेती करणे व जोडधंदा शेतीपूरक व्यवसायातून उत्पन्न वाढवणे याबाबत चर्चा केली वृक्ष लागवड बांबू लागवड आंबा लागवड संत्रा मोसंबी डाळिंब अंजीर पेरू सिताफळ लागवड शेकडो हेक्टरावर आराखडा घेतला

शेळीपालन कुक्कुटपालन गोड्या पाण्यातील मच्छी पालन रेशीम उद्योग मधुमक्षिका पालन सिमेंट बंधारे खोलीकरण विहीर जल भरण नवीन विहीर पाईपलाईन ठिबक सिंचन तुषार पाई धान्य गोदाम भाजीपाला शेडनेट शितगृह अस्तरीकरण शेततळे पिठाची चक्की तेलाचा घाणा स्वयंचलित रोटी मशीन धान्य सफाई मशीन पल्वरायझर मशीन गांडूळ खताचे शेड उपयोगी अशा अनेक योजनांचा आराखडा घेत लोकांची मागणी नोंदवून घेतली व पुढील लवकरच या योजना लागू होण्यास सुरुवात होईल असे सांगितले समितीच्या काही पदाधिकाऱ्यांची नवीन नेमणूक केली. गावातील एकही व्यक्ती लाभापासून वंचित राहू नये या उद्देशाने साधक बाधक चर्चा करून अनेक योजनांचा मागणी आराखडा घेण्यात आला पुढील काळात या सर्व योजना १००% ते ८० टक्के अनुदान योजना आहेत बारकाईने केल्यास त्या सर्व सवलतीच्याच दरात मोफत पूर्ण करता येतात बिगर शेती महिलांना सुद्धा या योजनेचा लाभ घेता येतो कागदपत्रांची पूर्तता करून नोंदणी करावी असे सांगितले.

**पाहिजेत**

**स्व.बॅ.रामराव देशमुख बहुउद्देशिय शिक्षण व क्रिडा प्रसारक संस्था**
निवाणा ता.संग्रामपुर जि.बुलडाणा (अल्पसंख्यांक संस्था) व्दारा संचालीत

माध्यमिक विद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालय व महाविद्यालया करिता खालील पदे भरणे आहे

| अ.क्र. | पदाचे संवर्ग | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता | सामाजिक आरक्षण | |
|---|---|---|---|---|---|
| १ | उच्च माध्यमिक सहा.शिक्षक | ०१ | एम.ए. (इतिहास, सहकार) बि.एड. | | २०% अनुदानित |
| २ | प्राध्यापक | ०३ | एम.एस्सी.भौतिकशास्त्र, बि.एड. | | कायम विना-अनुदानित |
| ३ | प्राध्यापक | ०३ | एम.एस्सी.रसायनशास्त्र, बि.एड. | | कायम विना-अनुदानित |
| ४ | प्राध्यापक | ०३ | एम.एस्सी.जिवशास्त्र, बि.एड. | खुला प्रवर्ग | कायम विना-अनुदानित |
| ५ | प्राध्यापक | ०३ | एम.एस्सी.गणित बि.एड. | | कायम विना-अनुदानित |
| ६ | प्राध्यापक | ०३ | एम.ए.मराठी, बि.एड. | | कायम विना-अनुदानित |
| ७ | प्राध्यापक | ०३ | एम.ए.इंग्रजी. बि.एड. | | कायम विना-अनुदानित |
| ८ | प्राध्यापक | ०१ | एम.ए.इतिहास, सहकार बि.एड. | | कायम विना-अनुदानित |
| ९ | प्राध्यापक | ०१ | एम.ए. समाजशास्त्र, राज्यशास्त्र बि.एड. | | कायम विना-अनुदानित |
| १० | प्राध्यापक | ०१ | एम.ए.अर्थशास्त्र, बि.एड्. | | कायम विना-अनुदानित |
| ११ | प्राध्यापक | ०१ | एम.कॉम. पुस्त. व लेखाकर्म वा. संघटन बि.एड. | | कायम विना-अनुदानित |

वरिल पदासाठी एम.एस्सी.एम.ए. व बिएड पदवी व्दितीय श्रेणीत (५० % च्यावर गुण) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. पात्र व इच्छुक उमेदवारांनी स्वखर्चाने मुळ कागदपत्रासह दिनांक १७/०६/२०२५ रोज मंगळवार ला सकाळी ११.०० वाजता प्रत्यक्ष मुलाखतीसाठी मुळ कागदपत्रांसह कार्यालय : स्व. बॅ. रामराव देशमुख शिक्षण संस्था निवाणा ता.संग्रामपुर जि. बुलडाणा येथे हजर राहावे.
टिप:- वयोमर्यादा व इतर निकष शासन नियमानुसार राहतील.
मुलाखतीचे ठिकाण:- कार्यालय : स्व. बॅ. रामराव देशमुख बहुउद्देशिय शिक्षण व क्रिडा प्रसारक संस्था निवाणा ता.संग्रामपुर जि.बुलडाणा

– **अध्यक्ष,** स्व.बॅ.रामराव देशमुख बहुउद्देशिय शिक्षण व क्रिडा प्रसारक संस्था, निवाणा, ता. संग्रामपूर जि.बुलडाणा

RNINo-MAHMAR 2010/35857 महासागर खामगांव(बुलढाणा)
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय मो.बा.९०२८४५८८८७ भगवान महावीर चौक, खामगाव येथे प्रकाशित केले. मुख्यसंपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय- नागपूर मो.बा.७४४७७३८८५१, ९९२२९७००२३ बुलडाणा जिल्हा आवृत्ती प्रमुख, स्थानिक संपादक यशवंत विनायक पिंगळे मो.बा.९५६१३६१४०४, (शहर कार्यालय-रेल्वेस्टेशन चौक, खामगाव) ई-मेल-yashwantpingle525@gmail.com

